नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३५६ | Issue - 356 | वार गुरुवार दि. १५ मे २०२५ | Blow- Thursday Date 15 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राष्ट्रपति भवनात आयोजित एका विशेष समारोहात न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या मुख्य न्यायाधीश (उगख) म्हणून आज सकाळी शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

या समारोहाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनगड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग,कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि कायदा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाल १३ मे २०२५ रोजी संपल्यानंतर न्यायमूर्ति गवई यांनी हे पद त्यांच्याकडून स्वीकारले.

न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. ते प्रसिद्ध राजकारणी, आंबेडकरवादी नेते, माजी खासदार आणि विविध राज्यांचे राज्यपाल राहिलेले रा.सु. गवई यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या कुटुंबाला डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या विचारांचा समृद्ध वारसा आहे आणि ते बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. न्यायमूर्ति गवई यांनी १९८५ मध्ये नागपूर विद्यापीठातून बी.ए. एल.एल.बी. पूर्ण करून आपल्या कायदेशीर कारकीर्दीला सुरुवात केली. १९८७ मध्ये त्यांनी बॉम्बे

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली शपथ

उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली, प्रामुख्याने नागपूर खंडपीठात. १९९२-९३ मध्ये त्यांनी सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त लोक अभियोजक म्हणून कार्य केले. २००३ मध्ये त्यांची बॉम्बे उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २००५ पासून ते कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदोन्नती मिळाली.

न्यायमूर्ति गवई यांची सरन्यायाधीशपदासाठी नियुक्ती सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठतेनुसार झाली आहे, सरन्यायाधीस संजीव खन्ना यांच्यानंतर दुसरे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २९ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली होती. न्यायमूर्ति गवई यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाल सुमारे सहा महिन्यांचा असेल. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी वयाच्या ६५व्या वर्षी निवृत्त होतील.

सर्वोच्च न्यायालयात असताना, न्यायमूर्ति गवई यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये, त्यांनी पाच न्यायाधीशांच्या खंडपीठात सहभाग घेऊन केंद्र सरकारच्या २०१९ च्या अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या निर्णयाला सर्वसंमतीने मान्यता दिली. २०१६ च्या विमुद्रीकरणाच्या निर्णयाला बरकरार ठेवणाऱ्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता. राजकीय निधीसाठीच्या इलेक्टोरल बाँड योजनेला असंवैधानिक ठरवणाऱ्या खंडपीठाचा ते भाग होते. २०२४ मध्ये, अवैध बांधकामांविरुद्ध बुलडोजर कारवाईवर देशव्यापी मार्गदर्शक तत्त्वे जारी करणाऱ्या खंडपीठात त्यांनी अमूल्य योगदान दिले आहे. पंजाब राज्य बनाम दविंदर सिंग (२०२४) खटल्यात, त्यांनी डउ/डढ साठी क्रीमी लेयर सिद्धांत लागू करण्याची वकिली केली, ज्यामुळे वास्तविक समानता सुनिश्चित होईल. न्यायमूर्ति गवई यांनी ७०० हून अधिक खंडपीठांमध्ये सहभाग घेतला आहे आणि सुमारे ३०० निर्णयांचे लेखन केले आहे. ज्यामध्ये संवैधानिक, प्रशासकीय, नागरी, फौजदारी आणि पर्यावरणीय कायद्यांचा समावेश आहे.

# राज्यात पुढील पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

## हवामान खात्याचा अंदाज; ढगाळ वातावरणामुळे तापमानात घट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मागील काही दिवसांपासून राज्यात सतत हवामानात बदल होताना दिसतोय. कधी तीव्र उष्णता तर कधी मुसळधार पाऊस असे चित्र आहे. मुळात म्हणजे होळीनंतरच राज्यातील हवामान पूर्ण बदलले आहे. होळीनंतर उष्णता वाढणार असे संकेत होते. मात्र, प्रत्यक्षात पूर्ण उलटे झाले. काही महिन्यांपासून राज्यात सतत अवकाळी पाऊस हजेरी लावताना दिसला. काही भागांमध्ये तर जोरदार गारपिट झाल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. भर उन्हाळ्यात पाऊस सुरू असल्याचे चित्र बघायला मिळाले. काही ठिकाणी पारा ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जाताना देखील दिसला. विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने झोडपून काढले.

विदर्भात एकीकडे पाऊस तर काही शहरांमध्ये तापमानाचा नवा उच्चांक पाहायला मिळाला. यंदा मॉन्सून लवकरच येणार असल्याचे संकेत असून आता हवामान खात्याने मोठा अंदाज वर्तवला आहे. राज्यात पुढील पाच दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा हा देण्यात आलाय. राज्यात पावसाला पोषक वातावरण आहे. यावेळी फक्त विदर्भ आणि मराठवाडाच नाही तर कोकणासोबत मध्य महाराष्ट्रात देखील पाऊस हजेरी लावणार आहे.

राज्यात पुढील चार दिवस पावसाची हजेरी असणार आहे. ढगाळ



वातावरणामुळे तापमानात घट होताना दिसतंय. यंदा राज्यात भर उन्हाळ्यात पाऊस येताना दिसतोय. छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, सोलापूर, धाराशिव, जालना, अकोला, वाशिम, नागपूर, गडचिरोली, गोदिंया, धुळे, आहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, रायगड याठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

दुसरीकडे सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांना मॉन्सूनपूर्वीची कामेही अजून करता आली नाहीत. शिवाय पावसामुळे मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. यंदा राज्यात पाऊस चांगला असण्याचेही संकेत आहेत. मागील काही दिवसांपासून वातावरणात बदल होताना दिसले. काही शहरांमध्ये पारा वाढताना दिसला तर काही ठिकाणी अवकाळी पाऊस झाला. अवकाळी पावसामुळे आंब्यांचे मोठे नुकसान झाले. नाशिकमध्ये काही दिवसांपूर्वी मोठी गारपिट झाली.



## कृपया फेरविचार करा! आम्ही संकटात सापडू! पाकिस्तानचे भारतापुढे लोटांगण, पत्रातून विनंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तान कठोर पावलं उचलली. सिंधू जल समझोता रद्द करण्याचा निर्णय पाकिस्ताननं घेतला. त्यामुळे सिंधू नदीतून पाकिस्तानला जाणारं पाणी रोखण्यात आलं. याबद्दल भारत सरकारनं पुनर्विचार करावी, अशी विनंती पाकिस्तान सरकारकडून भारताला करण्यात आलेली आहे. पाकिस्तानच्या जल संसाधन मंत्रालयानं भारताच्या जल शक्ती मंत्रालयानं यासाठी पत्र लिहिलं आहे.

सिंधू नदीचं पाणी रोखल्यानं पाकिस्तानात गंभीर जल संकट निर्माण होऊ शकतं. त्यामुळे भारतानं या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी विनंती पाकिस्तानकडून करण्यात आली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे पत्र पाकिस्तानच्या जल संसाधन मंत्रालयानं नियमानुसार परराष्ट्र मंत्रालयाला पाठवलं आहे. पण भारतानं पाकिस्तानची विनंती फेटाळून लावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला संबोधित करताना सिंधू जल समझोत्याबद्दलची भारताची भूमिका अतिशय स्पष्ट आणि स्वच्छ शब्दांत मांडली. पाणी आणि रक्त एकाचवेळी वाहू शकत नाही, असं मोदी म्हणाले होते. त्यांचं हे विधान सिंधू जल समझोत्याशी संबंधित होतं. भारतानं पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवरील कारवाई केवळ स्थगित केली आहे. आता आम्ही पाकिस्तानला प्रत्येक मापदंडावर जोखून बघू. त्यांचा पवित्रा कसा आहे ते पाहू, अशा शब्दांत मोदींनी भारताची भूमिका मांडली.

### जलसंपदा चा आकाः कार्यकारी अभियंता अमोल निकम यांचा प्रताप

### गुन्हा दाखल करावा : सुशांत मोरे

# पत्नीच्या नावे कंपनी काढून घेतली कोट्यवधी रुपयांची टेंडर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा / प्रतिनिधी

कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत जिहे-कठापूर उपसा सिंचन, कृष्णानगर सातारा चा कार्यकारी अभियंता अमोल निकम यांनी वेगवेगळ्या ठेकेदारांना ७६३ कोटी ७७ लाख ६७ हजार ३८९ इतक्या रकमेची टेंडर देऊन विविध कंपन्यांच्या नावावर आर्थिक रक्कमेच्या रुपयांचा गफला केला आहे. या कंपन्यांमध्ये पत्नीला भागीदार करुन प्रत्यक्ष कृष्णा खोऱ्याची टेंडर देऊन ठेकेदारांकडून सरकारी पैसा लाटला आहे. या प्रकरणात सरकारी नियम धाब्यावर बसवले गेले आहेत. ठेकेदाराच्या नावे टेंडर घेऊन पत्नीच्या कंपन्यांच्या नावावर पैसा लाटणा-या कार्यकारी अभियत्याची लाचलुचपत प्रतिबंधक कायदाखाली चौकशी तसेच बेनामी संपत्ती कायद्याखाली गुन्हा दाखल करुन

त्याला ३१ मे पर्यंत बडतर्फ करावे आणि आयकर विभाग, ईडी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करावी,अशी पुराव्यानिशी तक्रारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. श्री. निकम यांना बडतर्फ न केल्यास योग्य त्या न्यायालयात दाद मागण्याचा इशारा माहिती सामाजिक, माहिती अधिकार कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

### .... तर लोकप्रतिनिधीही अडचणीत येणार

**अमोल निकम या कार्यकारी अभियंत्याचे वैशिष्टय असे की त्याला आमदार, खासदार, मंत्री यांनी मुदतवाढीसाठी पत्रे दिली आहेत. हा सगळ्याच लोकप्रतिनिधींचा लाडका आहे, त्यामुळे त्याच्या कृष्णकृत्यामुळे लोकप्रतिनिधीही अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुदतवाढीचे पत्रे त्यांनी कोणत्या हेतूने दिली याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.**

याबाबत अधिक माहिती सांगताना श्री. मोरे म्हणाले, अमोल पंडीतराव निकम, कार्यकारी अभियंता जिहे कठापूर उपसा सिंचन विभाग सातारा या ठिकाणी गेले ६ वर्षे एकाच ठिकाणी, एकाच हुद्दावर कार्यरत आहेत. शासनाच्या निर्णयानुसार एक व्यक्ती एका पदावर तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी पर्यंत राहू शकत नाही. मात्र श्री. निकम हे स्थानिक लोकप्रतिनिधी, मंत्री महोदय यांच्या आशीर्वादाने कायम मुदत वाढ घेत आली आहे. त्यामुळे हम करेसो कायदा अशी काहीशी प्रवृत्ती बळावत आहे. एका पुणे विभागामध्ये मागील १५ वर्षापासून हा अभियंता कार्यरत आहे. अतिशय दादागिरी करुन कंत्राटदारांना लुबाडणे, स्वतःच्या नातेवाईकांचे नावावर कामे घेणे, कामाचे वाटप करणे अशा प्रकारे सुरु आहे. स्वतःच्या भांडवली कंपन्या स्थापन करुन पत्नी व नातेवाईकांचे नावे कंपन्या स्थापन करुन थेट कामे त्या कंपनीद्वारे करुन खात्यावर पैसे वळते करणे अशा प्रकारचे उद्योग सुरु आहेत. माहिती अधिकारात पुणे, सातारा इतर कार्पोरेट व्यवहार मंत्रालय, पुणे कार्यालय, कंपनी कायदा, मर्यादित दायित्व भागीदारीबाबत मिळालेल्या कागदपत्रावरुन श्री. निकम याच्याबाबत तक्रार केली आहे. त्यामुळे मिळालेल्या माहितीनुसार अमोल निकम यांच्या कार्यकाळात ५ कोटीच्या वर दिलेल्या वर्क ऑर्डर याची चौकशी करुन संबंधीत निकम यांचे निलंबन करावे.

श्री. निकम यांनी ६ जानेवारी २०२२ रोजी मे. एस. व्ही. जाधव कॉन्ट्रक्टर प्रा. लि. साठे कॉम्प्लेक्स मिरज यांना, ६ मार्च २०२० रोजी मे. माधुरी अमोल मोरे, बारामती यांना, ९ मे २०२३ रोजी मे. एन. एन. के. कन्स्ट्रक्शन इलेक्ट्रोटेक, पुणे यांना, १२ मे २०२३ रोजी मे. एस. व्ही. जे + आय.एच.पी.+ योगीराज पॉवरटेक+ पृथ्वीराज देसाई, सांगली यांना, २० जून २०२३ रोजी सचिनकुमार संभाजीराव नलवडे, वाढे सातारा यांना, १५ मार्च २०२४ रोजी सचिनकुमार संभाजीराव नलवडे, २६ मे २०२३ रोजी मे. महावीर सिव्हील इंजिनिअरींग ण्ड सर्व्हसेस प्रा. लि. + ए.आर. डब्ल्यु इन्फ्रा प्रोजेक्ट, पुणे यांना, २९मे २०२३ रोजी सोनाई आर.एम. एन. एस. सी.सी. सांगली यांना, १५ मार्च २०२४ रोजी अमोल निगडे, पुणे यांना, १५ मार्च २०२४ रोजी सचिनकुमार संभाजीराव नलवडे, वाढे सातारा यांना, २० जून २०२३ रोजी श्रीगणेश कन्स्ट्रक्शन, गोडोली, सातारा यांना अशा एकूण ७६३ कोटी ७७ लाख ६७ हजार ३८९ इतक्या रक्कमेच्या निविदा देवून या ठेकेदारांकडून पैसे पत्नीच्या कंपन्या मधे घेऊन भ्रष्टाचार केलेला आहे.

### ... तर नेत्यांच्याही लक्षात येईल

**सचिन नलावडे नावाचा एक छोटा कॉन्ट्रॅक्टर या घोटाळ्यात सहभागी आहे. त्याच्या नावावर कोट्यवधी रकमेची टेंडर आहेत. त्याला कोणत्या तात्या, मामा, भैय्या, भाऊ, काकाचा आशीर्वाद आहे याचाही शोध गृहखात्याने किंवा देशाच्या ईडीने घ्यावा. इतका छोटा कॉन्ट्रॅक्टर कमी कालावधीमध्ये इतका मोठा घोटाळा कसा काय करु शकतो ? याची चौकशी केली की पडद्यामागचे सगळे सूत्रधार प्रकट होतील आणि नेत्यांच्याही लक्षात येईल वाटप कितीचे आणि हिशोब कितीचा ?**

### तीन कंपन्यात पत्नीची भागीदारी

**विश्वराज बिल्डकॉन एल.एल.एल,पी, पुणे, पीएमबी इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी.पुणे आणि भूविकास इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी पुणे या तीन कंपन्यांमध्ये श्री.अमोल निकम यांच्या पत्नी सौ. स्वप्नाली अमोल निकम या भागीदार आहेत. त्यामुळे आयकर विभाग, ईडी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या मार्फत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.**

या सर्व कामांची, तुलनात्मक तक्ता, वर्क ऑर्डर, दिलेली सर्व देयके, झालेले काम एम.बी. रजिस्टर इत्यादी याची सखोल चौकशी करावी. वर्क ऑर्डर दिल्यानंतर काहीच दिवसात काम करण्यापुर्वी बिल काढण्यात आले आहे. या दिलेल्या सर्व वर्क ऑर्डर त्यांची कामे संबंधीत कंपन्या यांचे लागेबांधे श्री. अमोल निकम आणि त्यांच्या परिवाराशी निगडीत आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीबाबत कोटयावधी रुपयांच्या या दिलेल्या वर्क ऑर्डर आर्थिक तडजोड करुन केलेल्या असून अधिकाराचा दूरुपयोग करुन टेक्निकल बीड बसत नसताना,

कागदपत्रे अपूर्ण असताना लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली आणि मोठ्या आर्थिक तडजोडी करुन या वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत. एस.व्ही. जाधव कॉन्ट्रक्टर प्रा. लि. मिरज, आणि मे. एस. व्ही. जे. या दोन्ही कंपनी एकाच मालकाच्या आहेत. श्री. जाधव शशांक हे मालक असून त्यांचा मुलगा शुभम शशांक जाधव आणि अमोल निकम यांच्या सुविद्य पत्नी स्वप्नाली अमोल निकम हे दोघे विश्वराज बिल्डकॉन एल.एल.पी. या कंपनीचे भागीदार आहेत. अदित्य साहेबराव भोसले, बावधन ता. वाई जि. सातारा यांना दहा लाखांच्या आतील निकम यांनी त्यांच्या का आहेत. आदित्य भोस कोटयावधी रुपयांची आदित्य भोसले यांच्या निकम यांचे कुटुंबिय भागीदार असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट झाले आहे. पीएमबी इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी, भुविकास इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपी या कंपनीत स्वप्नाली निकम या भीगादार आहेत. धाराशिव जिल्हयातील जलसंपदा विभागात कार्यरत असणारे वरिष्ठ अधिकारी विजय थोरात हे अमोल निकम यांचे घनिष्ठ मित्र, नातेवाईक आहेत हे कागदपत्रावरुन सिध्द होत आहे. श्री. निकम, कार्यकारी अभियंता जिहे कठापूर उपसा सिंचन विभाग या पदावर हजर झाल्यापासून आजअखेर आपले, आपल्या कुटुंबियांचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यात तत्पर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या वर्क ऑर्डर, दिलेली बिले, झालेली निकृष्ठ दर्जाची कामे संबंधीत सर्व कंपन्या आणि वर्क ऑर्डर दिलेले ठेकेदार आणि कंपन्या यांच्या कामाचे, बिलांचे आर्थिक देवघेवीचे रेकॉर्डची तसेच मालमत्तेची एसआयटीमार्फत चौकशी करावी. अन्यथा चौकशी प्रभावित होवू शकते.




शासनाने दिलेल्या अधिकाराचा पुरेपुर दुरुपयोग त्यांनी त्यांचे कार्यकाळात, त्यांनी मंजूरी दिलेली सर्व कामे, पत्नी सहभाग असणाऱ्या कंपनीला दिलेल्या बिलांची तसेच त्यांची, त्यांची पत्नी, मुले व त्यांचे नातेवाईक यांच्या नावे असणाऱ्या खासगी कंपनी आणि बेहिशोबी मालमत्तेची लागेबांधे, आर्थिक व्यवहार, बँक खात्याचे व्यवहार, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हितसंबंध, मालमत्ता याची सखोल चौकशी करावी. या कार्यकाळात त्यांनी ठेकेदार, नातेवाईक, यांचे सिडीआर, कॉल रेकॉर्ड, व्हॉटसअप रेकॉर्ड इत्यादीची चौकशी करुन, शासनाची फसवणूक करणाऱ्या श्री. अमोल निकम या अभियंत्याला ३१ मे पर्यंत थेट निलंबन किंवा बडतर्फ करावे. अन्यथा योग्य त्या न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशाराही श्री.मोरे यांनी यावेळी दिला.

### प्रशासकीय राजवटीची सखोल चौकशी व्हावी

**सातारा जिल्हयात सध्या प्रशासकीय राजवट आहे. अनेक अधिकारी पत्नीच्या, नातेवाईकाच्या नावावर व्यवसाय दाखवून आणि त्याचा वापर आपले गोरखधंदे लपवण्यासाठी करतात. काही जण पत्नीला सोबत घेऊन अधिकार गाजवतात. सगळे अर्थपूर्ण व्यवहार पती, पत्नी, अधिकारी जिल्हयात अनेक ठिकाणी करत आहेत.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### भारताची भूमिका

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तान कठोर पावलं उचलली. सिंधू जल समझोता रद्द करण्याचा निर्णय पाकिस्ताननं घेतला. त्यामुळे सिंधू नदीतून पाकिस्तानला जाणारं पाणी रोखण्यात आलं. याबद्दल भारत सरकारनं पुनर्विचार करावी, अशी विनंती पाकिस्तान सरकारकडून भारताला करण्यात आलेली आहे. पाकिस्तानच्या जल संसाधन मंत्रालयानं भारताच्या जल शक्ती मंत्रालयानं यासाठी पत्र लिहिलं आहे. सिंधू नदीचं पाणी रोखल्यानं पाकिस्तानात गंभीर जल संकट निर्माण होऊ शकतं. त्यामुळे भारतानं या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी विनंती पाकिस्तानकडून करण्यात आली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हे पत्र पाकिस्तानच्या जल संसाधन मंत्रालयानं नियमानुसार परराष्ट्र मंत्रालयाला पाठवलं आहे. पण भारतानं पाकिस्तानची विनंती फेटाळून लावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला संबोधित करताना सिंधू जल समझोत्याबद्दलची भारताची भूमिका अतिशय स्पष्ट आणि स्वच्छ शब्दांत मांडली. पाणी आणि रक्त एकाचवेळी वाहू शकत नाही, असं मोदी म्हणाले होते. त्यांचं हे विधान सिंधू जल समझोत्याशी संबंधित होतं. भारतानं पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवरील कारवाई केवळ स्थगित केली आहे. आता आम्ही पाकिस्तानला प्रत्येक मापदंडावर जोखून बघू. त्यांचा पवित्रा कसा आहे ते पाहू, अशा शब्दांत मोदींनी भारताची भूमिका मांडली. आम्ही कोणत्याही पातळीवर दहशतवाद खपवून घेणार नाही. पाकिस्तान सरकार, तिथलं सैन्य दहशतवादाला खतपाणी घालत आहे. यामुळे एक दिवस पाकिस्तानच संपून जाईल. त्या देशाचं अस्तित्वचं संपुष्टात येईल. पाकिस्तानला तगून राहायचं असेल तर त्यांना त्यांच्या देशातील दहशतवादाचा सफाया करावा लागेल, असं मोदी म्हणाले होते. दहशतवाद आणि संवाद एकाचवेळी होऊ शकत नाही. दहशतवाद आणि व्यापार एकाचवेळी होऊ शकत नाही. त्यासोबतच पाणी आणि रक्तदेखील एकाचवेळी वाहू शकत नाही, असं मोदींनी नुकतेच म्हटलं होतं.

# विवेक आणि धार्मिकता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मित्रांनो जगभरात दान,गुप्त दान, याचा रेशो पाहिला तर तो सर्वात जास्त वाढताना दसतो आहे, हे सर्वच धमतील धार्मिक स्थळांमध्ये जास्त दिसत आहे.

बऱ्याच वेळ श्रद्धेपोटी लोक दान-धर्म करतात.

श्रद्धा संपली की भीतीपोटी लोक दान करतात. भीती संपली की अंधश्रद्धेपोटी लोक दान करतात.काही लोक पापातून मुक्ती मिळवीण्यासाठी दान करतात. हे सर्व मानवी मनाचे कंगोरे आहेत. भक्ती, दया, श्रद्धा, अंधश्रद्धा, पाप मुक्तता, दया या भावनेच्या आधारावर हे दान धर्म केल्याचे दिसते. सोबत इच्छापूर्तीसाठी आणि प्रतिष्ठेसाठी ह्याही गोष्टीसाठी लोक दान धर्म करतात. त्यातील चांगले आणि वाईट दोन्ही गोष्टीचं चिंतन आपण आज करणार आहोत.

विवेक जागृत ठेवून ज्या ज्या गोष्टी आपण करतो त्या चांगल्या आसतात. असं समाजमन बोलते.

प्रथम आपण विवेकी विचारातून केलेल्या कार्याबद्दल विवेचन करणार आहोत.श्रद्धा, भाव,भक्ती या माध्यमातून जे दान आपण आपल्या धार्मिक स्थळांना देतो,लोकांना मदत करतो,पिढीतांना मदत करतो.दान देतो ते सर्वात छान आहे.यातून माणसाला आनंद मिळतो. समाजात मान्यता मिळते. त्या व्यक्तीचं कौतुकही होतं. जसे विविध सण, उत्सव, महोत्सव असतात, त्यावेळी आपण जेवण देतो. धन दान करतो. त्यातून त्या माणसांना, दान दात्यांना समाधान आणि आनंदही मिळतो. सामाजिक प्रतिष्ठाही मिळते. या दानाला या, मदतीला समाजामध्ये विशेष स्थान दिलं जातं. कारण ते दान हे निस्वार्थ भावनेनी दिलेले असते.मग ते दानपेटीत देऊ देत. जेवणावळी घालू देत. पंगती घालून देऊ देत.त्या अन्नदानाला विशेष स्थान दिले जाते.त्या दान दात्याला पुण्यवान व्यक्ती असेही संबोधले जाते. त्यातून समाजमनाची निर्मिती होते.लोक चांगुलपणा पाहत असतात. तसंच अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असतात. यातून दायित्वाची भावना निर्माण होते. परोपकाराची भावना निर्माण होते. तेव्हा अशा कार्य करणाऱ्यांना, दानशूर म्हणूनही संबोधले जाते.अशा पद्धतीची मदत,अशा पद्धतीचं दान, अशा पद्धतीचे कार्य हे सामाजिक बदलासाठी समाजमन तयार करण्यासाठी दायित्वाची भावना निर्माण करण्यासाठी होते.म्हणून अशा दानाला समाजामध्ये विशेष मान्यता आहे. त्या दानामध्ये कुठलाही स्वार्थ नसतो. फक्त भाव आणि भक्तीचा संगम असतो.

आता आपण अविवेकी दान म्हणजे काय? त्याचा विचार करणार आहोत. अंधश्रद्धेच्या पोटी केलेलं दान, पापातून मुक्ती मिळविण्यासाठी केलेलं दान, प्रतिष्ठेसाठी आणी मोठेपणा मिळविण्यासाठी केलेले दान. धन मिळविण्यासाठी केलेले दान किंवा बळी, नरबळी.यास समाजामध्ये स्थान नाही. यास धर्म मान्यता देत नाही. समाज मान्यता देत नाही.जो असे कृत्य करतो, त्यालाही समाधान मिळत नाही. कारण तो आशा घेऊन येत असतो. अपेक्षा घेऊन तो दान करत असतो. काही मागणी करत असतो. काही मिळवण्यासाठी तो कधीकधी बळीही देत असतो. यामध्ये पशुबळी असेल,नरबळी असेल असे अविवेकी कार्य तो करत असतो.

पाप केलं म्हणून मुक्ती मिळविण्यासाठी धार्मिक स्थळांना देणगी देतो.गुप्तदान करतो, नावासाठी,प्रतिष्ठा मिळवण्यासाठी दान करणारे असेही महाभाग दिसतात. मी दान दाता आहे हा अविर्भाव समजाला दाखवण्याचा अटहास ते करत असतात. इतका आटापिटा करूनही त्यांना शांतता मिळत नाही. शांत झोप लागत नाही. किंवा आनंद मिळत नाही. किंवा पुण्य केल्याचं समाधान मिळत नाही. पाप केल्यानंतर देवाचा प्रकोप होऊ नये, म्हणून देवाला बळी दिला जातो. भीतीपोटी, देवाला वश करून घेण्यासाठी, लाच या पद्धतीने देवाला दान करतात.आणि मागणी घालतात, देवा माझं भलं कर.मला माफ कर.देवा मी चुकलो. मी तुला पैसे देतो. सोनं देतो. बकरं कापतो. कोंबड कापतो. जमल्यास नरबळी देतो. इथपर्यंत माणूस जातो. आणि देवाला खरेदी करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो.

मित्रांनो खरं बोलायचं झालं तर विवेक जागृत ठेवून, सत्याचं वास्तव समोर ठेवून, विज्ञान वाद स्वीकारून, चिंतन करावं लागेल.

तुमच्या माझ्या भाबड्या कल्पनेचा विचार करून खरच देव आहे असे गृहीत धरून आपण काम करायला लागलो तर, जो देव सृष्टीचा निर्माता आहे. त्यानं हवे तसे, प्राणी, पक्षी, झाडे फुल झाडे किती-किती हर तऱ्हेनी सृष्टी निर्माण केली आहे. लाखो रंग वापरलेले आहेत. हुरळून जावं एव्हढी सुंदर सृष्टी निर्माण केली आहे. विविध प्रकारचे लाखो जीव निर्माण केलेले आहे.त्याला हवं तसं निर्माण करतो. त्याला नको वाटलं तर तो समाप्त करतो.तोच करतो आणि तोच मारतो. तर मग आपल्यासारख्या शूद्र माणसाकडून एखादा बळी घेण्याची त्याची इच्छा कशी व्हावी .ह्या सर्व माणसांच्या मनाच्या कल्पनेचा भाग आहे.

माणसांच्या गरजा, पुर्ण करण्यासाठी पैसा असेल,सोन असेल, किंवा इतर वस्तू असतील ही साधने माणसाच्या सोयी आणि सुविधा निर्माण करण्यासाठी माणसाने निर्माण केली आहेत. देव आहे असं गृहीत धरले तर जो देव ह्या पृथ्वीचा निर्माता आहे. त्याला तुमच्या कागदी नोटाचा काहीच उपयोग नाही. त्याला त्याची गरजच नाही.कारण तो सर्व करता करावीत आहे.त्या साधनाचा, त्या पैशाचा, त्या सोन्याचा देवाला काहीच उपयोग नाही.त्याला काहीच घेणं देणं नाही. जर निर्मिती ही त्याचीच असेल तर आपण त्याला परत द्यायची गरज काय.? हे विश्व त्याचं असेल तर आपण निर्माण करून त्याला देणारे कोण? कुणीतरी लुटारू आपल्याला भीती दाखवतो,आणि त्या भीतीतून मुक्त होण्यासाठी आपण देवाला वश करण्याचा प्रयत्न करतो. हे सर्व धादांत खोटे आहे. चुकीचं आहे. काल्पनिक आहे.अशा गोष्टीवर विश्वास ठेवून कुठलेच कार्य माणसांनी करू नये.आपण आपल्या पैशाच्या, सोन्याच्या जोरावरती देवाला खरेदी करतो,असा त्याचा अर्थ आहे. आणि हे सर्व खऱ्या अर्थाने निरर्थक आहे.चुकीच आहे.यातून देवाचं समाधान नाही,ना तुमचं नाही. मग हा उठाठेऊ कशासाठी?

हे चिंतन, हा अभ्यास ज्या लोकांचा विवेक जागृत असतो ते लोक तसे वर्तन करत नाहीत.

आपण मागील पाच-पन्नास वर्षाचा विचार केला तर प्रत्येक धार्मिक स्थळांना जो पैसा, सोने, संपत्ती जमा होत आहे, ती अफाट आहे. मग ती धार्मिकतेच्या नावानी असो की इच्छापूर्तीच्या नावाखाली असो कोट्यावधीची प्रॉपर्टी धार्मिकतेच्या नावाखाली एकत्र जमा होते. ती जमा झालेली प्रॉपर्टी हे आजूबाजूचे अगले बगले, दैववाद सांगणारे,देवालाच लुटतात.असेच लोक वेळ पडली तर चोऱ्याही करतात. म्हणून खूप वेळा धार्मिक स्थळी चोरी झाल्याच्या बातम्या पेपरला छापल्या जातात.

धार्मिक स्थळांना दान कारवे,की नाही,हा प्रत्येकाच्या स्वभावाचा भावनेचा भाग आहे.

विवेक काय सांगतो. धर्म का करावा,दान का आणी केंव्हा करावं,

आपला धम्म काय सांगतो, तहानलेल्यांना पाणी द्या.भुकेलेल्यास अन्न द्या. बुडत्याला काठीचा आधार द्या. माणूस, प्राणी, पक्षी, पृथ्वीवरचे सर्व जीव सुखी राहायला पाहिजे.ही पृथ्वी आनंदी राहिली पाहिजे. सुखी राहिली पाहिजे. सृष्टी फुलताना,फळताना दिसली पाहिजे. याच्यासाठी जे जे करता येते ते ते माणसांनी केलं पाहिजे.

आज पृथ्वीवर वरुणाचा प्रकोप होताना दिसतो आहे.जल, जंगल,पाण्या खाली जातं आहे. डोंगर, दऱ्या,कड्या, कपारी कोसळत आहेत.माणसं, गावच्या गावं मातीमोल होताना दिसत आहेत. हा देवाचा प्रकोप नाही तर माणसाने केलेलं नुकसान आहे.आता ते भरून काढणे शक्य नाही.

मग माणसाने काय करावं असा प्रश्न समोर येत असेल तर,विकलांगाशी, दुर्बलांशी, अबलांशी दान करावं. तहानल्यांशी पाणी द्यावं.हेच कार्य सर्वदा करावं,आणि जाता जाता पाणी शुद्ध आणि पवित्र राहील पाहिजे, जंगल जिवंत राहीलं पाहिजे.फळे-झाडे फुलत राहिली पाहिजेत, याच्यासाठी काम करावं.

यातच पुण्य मिळेल.

खरं तर ईश्वर आहे हे आपल्या मनात दृढ असेल तर तो पाहायचा असेल तर ज्यांना आपण दान करतो, त्यांचे एकदा स्माईल पहा.त्याच्यात खऱ्या अर्थाने ईश्वराचे प्रतिरूप दिसायला लागेल.


सांगायचा महत्त्वाचा आणि शेवटचा भाग म्हणजे विवेक जागृत ठेऊन समाज हिताचं कार्य करत राहिलं पाहिजे.

शिक्षण ही ज्ञानगंगा म्हटली जाते. तर मग एका बाजूला शाळा पडताना का दिसते?? तर दुसऱ्या बाजूला सोन्याची धार्मिक स्थळे उभरताना दिसतात. यातील योग्यता तपासणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी योग्य मार्गाने जाण्यासाठी विवेक जागृत ठेवणे हेच महत्त्वाचे ठरेल....

**- लेखक भूमिपुत्र वाघ.**

# रंग आकार उधळण, महाबळेश्वर पाचगणी निसर्गाची

## (निसर्गआर्ट गॅलरी; सुनील काळे व स्वाती काळे यांचे प्रदर्शन जून २५ अखेर खुले)



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मेनवली १० मे २५ सौंदर्य दृष्टीत असते, तसेच सौंदर्य भौगोलिक नैसर्गिक निर्माण आतून पुढे चालत आलेले असते. स्थानिक असलेला निसर्गाला त्या भूभागावरील जनसामान्य समजून घेतात फक्त लाभासाठी पण स्थानिक निसर्ग स्थानिक डोंगरदऱ्या सूर्यास्त सूर्योदय धरणाचा जलाशय वृक्षराजी डोंगर कडा या सर्व सौंदर्याच्या खानि असतात याची प्रचिती जाण प्रतिभावंत कलावंतांना असते.यातून अनेक कलावंत वेगवेगळ्या कला प्रकाराकडे न जाता निसर्गचित्रांच्याकडे स्थानिक चित्रांच्या रेखाटनाकडे सातत्याने का जातात? हा एकचित्र , प्रेक्षक आणि प्रतिभावंत चित्रकार आणि स्थानिक निसर्ग यांचा एक संबंध जोडण्याचा अत्यंत कल्पक प्रयत्न असतो.

स्थानिक समृद्ध निसर्ग आणि त्यातील सौंदर्याची प्रचिती ही दृष्टी असणाऱ्या चित्रकाराने दाखवून दिली तर प्रेक्षकांना एक वेगळी आनंद अनुभूती येते आणि चित्रकार आपल्या स्थानिक निसर्गाचा, इतिहासाचा प्रचारक होऊ शकतो. हे स्थानिक सौंदर्य निसर्ग चित्रणाचा प्रयत्न हे सर्वच ठिकाणी कलावंताने करायलाच हवे असतात. आपल्या परिसरातल्या सामान्य ते असामान्य रचना या सौंदर्याची ठिकाणे असतात. ती विषय ठरतात याची जाणीव मात्र कलावंतांना व्हायला हवी असते.कलावंत आपला परिसर हा समृद्ध कला वारसा तयार करण्यासाठी कसा प्रयत्न करतात !याचे उदाहरण वाई मेणवली स्थित सुनील काळे व स्वाती काळे या दोन चित्रवेडया दांपत्याचे निसर्ग आर्ट प्रदर्शन सध्या साक्ष देते आहे.

सात जून २५ पर्यंत क्षेत्र प्रेमींच्यासाठी खुले असलेले हे निसर्ग आर्ट प्रदर्शन व पाहणे ही एक आनंदाने होती आहे दहा मे २०२५ रोजी सर्वोदय विजय दिवाण विद्या व्यासंगी रवींद्र घोडराज प्रस्तुत कार्यकर्ता निसर्ग आर्ट प्रदर्शनाला भेट देतात आणि रंगाच्या दुनियेत स्वतःला हरवून जातात वाई पासून पश्चिमेला मेनवली नजीक निसर्ग हे आधुनिक कला प्रदर्शनाचे केंद्र या दोन मनस्वी चित्र आनंदी कलावंतांनी सातारा पुणे मुंबई या कलाप्रेमींसाठी खुले केले आहे कॅलिओग्राफीमध्ये ज्यांचा अधिकार आहे अच्युत पालव यांच्या हस्ते या निसर्ग आर्ट प्रदर्शनाचे नुकतीच उद्घाटन झाले आहे.

निसर्ग आर्ट प्रदर्शनाच्या लोखंडी भव्य गेटमधून आत जातास उजव्या बाजूला ४८ चित्रांचा खजाना प्रेक्षकांना पहावयास मिळतो आहे आधुनिक पद्धतीने स्टॅन्ड वर लावलेली ही चित्रे प्रकाश झोत न टाकता लावली आहेत परंतु या चित्रांच्या मध्ये स्वाती काळे यांची असंख्य फुलांचे रचनेची चित्रे मोहक पद्धतीने प्रेक्षकांना खेळवून ठेवतात येतील एक चित्र पहिल्या रंगातील धबधब्याचे चित्र असून बाकी चित्र ही खास प्रेक्षकांच्यासाठी मुद्रित स्वरूपाची चित्रे उत्कृष्ट प्रेम मध्ये बद्ध करून लावण्यात आली आहेत विशेषतः पाचगणी आणि महाबळेश्वर ची सगळी सौंदर्य ठिकाणी आणि निसर्ग पॉईंट जवळपास १२ एकाच ठिकाणी पहावयास मिळतात हे सर्व चित्रे पाहताना एक सतत मला पुढे प्रश्न येतो की सुनील काळे हा मनस्वी चित्रकार रंग आणि निसर्ग ढग आणि आकाश यांच्यामध्ये उधळण बे फान पणे पुढे निघाला आहे आणि रंगांच्या दुनियेत प्रेक्षकांना लुबध करावयाचे आहे. असे दिसते चित्रात पाचगणी चा पसरणी घाट पाचगणी वरून दोन धरण आणि छोटी छोटी गावी आणि त्यांची भात शेती घरे दर्या यासाठी त्यांनी वापरलेला रंग ही एक उधळण आहे आणि दृष्टीची आकर्षण हेच त्यांनी साधली आहे त्यामुळे आपण दररोज पाहत असलेल्या ठिकाणांना त्यांनी रंगांचे परिमाण देऊन रंग आणि दृष्टी याचा एकच संघात साधण्याचा प्रयत्न केला आहे.

कलेसाठी जगणे कला जनमनात पोहोचवणे कलेचा प्रचार करणे कलेचा आनंद घेणे केलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे या सजग विचाराच्या कलावंत आहेत चित्र आणि चित्रकाराची प्रतिष्ठा आणि अर्थकारण याचे खूप छान गणित ज्यांना सोडवता येते त्यातील सातारा जिल्ह्यातील एकमेव हे चित्रकर्मी यशस्वी झाले आहेत. असे म्हटले तर चूक

## नवा संस्कृती केंद्राचा संकल्प

ठरणार नाही.

जर्मनीच्या कल्चर सेंटरच्या निर्मात्या विदुषी चित्रकार काळे ग्रामपंचायत आल्या होत्या वाईचा परिसर त्यांनी पाहिला आणि त्यांनीच त्या त्या भूभागातील सर्व क्षेत्रातील कलावंतांची सूची आणि केंद्र हे भारतात निर्माण होण्याची नितांत गरज आहे वाई मध्ये स्वतः तुम्ही तयार करावे असा त्यांनी केलेला आग्रह काळे यांनी मनात जपून ठेवला आणि मी २०२५ मध्ये स्वतःच निसर्ग आर्ट प्रदर्शन आणि स्थानिक कलावंताची सूची कल्चर सेंटरच्या निमित्ताने तयार करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला आहे काळे यांच्या बरोबर संवाद साधताना कलेबद्दल तुच्छता बाळगणारा जवळपास सहा नागरिक उपेक्षा करणारे उद्योगपती आणि समीक्षेचा हात आकडता घेणारे समीक्षक यांच्या बद्दल अत्यंत वेगळी मते नोंदवून ते म्हणतात की आपला समाज हा वेगळ्या गोष्टीला स्वीकारत नाही तो सतत इतर गोष्टीला नकारवादी भूमिकेने टाळत असतो आणि त्यामुळे स्वाभाविक सहज आनंद कला निर्मिती या सर्व क्षेत्रांमध्ये नैराश्य आणि उपेक्षा चित्रकारांच्या वाट्याला येते हे भारतातले कला पर्यावरण खूप दुःखद आहे काय जिल्हास्तरावर तालुका स्तरावर कला संस्कृती केंद्र नाही अध्यायावत आर्ट गॅलरी नाहीत नुकत्याच महाबळेश्वर महोत्सवामध्ये प्रशासनाने काळे दाम्पत्यांची चित्रे लावण्यास असहकार्य केल्याची कटूता त्यांनी व्यक्त केली.

जिद्द हे काळे कलावंतांचे वेगळेपण आहे सतत वेगळा पर्याय शोधणे स्वतंत्र निर्माण करणे आणि स्वायत्त कला विश्वात रममान होणे हा दोघाही कलावंतांचा असलेला स्वभाव एक दुर्मिळ गोष्ट आहे कटुता पाठीमागचा इतिहास उपेक्षा आणि स्थानिक असंख्य प्रकारचे विचित्र अनुभव हे सगळे पाठीवर टाकून हे दोन कलावंत निसर्ग आर्ट प्रदर्शन ज्या पद्धतीने आनंद लुटण्यासाठी खुले करून ठेवतात ही गोष्ट चित्रकला क्षेत्रासाठी जितके अभिमानाची आदर्शाची आहे तितकाच याचा प्रचार आणि प्रसार ही व्हायला हवा असे मनोमन वाटून राहते.

कलावंतांना जिवंत असताना भारतीय समाजात स्थान नाही त्यांच्या चित्रांची विक्री होत नाही त्याची समीक्षा आणि बोलबाला होत नाही याचे कारण काय कारण भारतीय धनिकांनी राजकारण्यांनी उद्योगपतींनी जागतिक स्तरावरील देशी आणि आंतरराष्ट्रीय चित्रकारांची त्यांच्या मृत्यूच्या पाश्चात चित्रे खरेदी करण्याचा जो एक पायंडा पाडला आहे त्यामुळे वर्तमानातील सम काळातील चित्रकारांना न्याय मिळत नाही ही सुनील काळे यांनी व्यक्त केलेली खंत खूपच मनाला स्पर्शून गेले व्यक्ती असताना कार्याबद्दल योगदानाबद्दल समाज कृतज्ञ भावना समकाळात व्यक्त करत नाही आणि मृत्यू उत्तर काळात कलावंतांच्या बद्दल गहिवर आणि अभिमान व्यक्त केला जातो हा भारतीय नागरिकांचा दुटप्पी आणि खोटा चित्रकलेचा प्रेम वर्तन भाव असल्याचेही काळे यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील कला विश्वातील मुंबई जहांगीर आर्ट सह पुणे कोल्हापूर सर्व मोठ्या शहरातील कला दालनांचे राजकारण व जाचक नियम यांच्या सुरसकथा काळे यांनी ऐकवल्या तेव्हा वाटून राहिले कल्चरल सेंटर तालुकास्तरावर उभी करण्याबाबत धुरीनांनी पुढाकार घेतला पाहिजे भारतातील समृद्धी आणि निसर्गाकडे धावणारा पर्यटक हा हॉटेलमध्ये थांबतो आहे पर्यटन स्थळापर्यंत जातो आहे पण सौंदर्य आस्वाद आणि कलानंदाची समृद्धी तो न घेताच परत फिरतो आहे केवळ खाद्य हा परिपूर्ण आनंद नाही आणि म्हणून महाबळेश्वर पाचगणी वाई शहरात सभोवतांच्या निसर्गासाठी भटकंती करणारा पर्यटक हा निसर्ग अर्थ प्रदर्शनाच्या ठिकाणी यावा याचे सातत्य वाढावे याची माहिती प्रेक्षकांना व्हावी पर्यटकांना व्हावी शाळांना व्हावी कला महाविद्यालयांना व्हावी आणि हे एक मुक्तकला केंद्र चित्रीकरण डेमो स्टेशन प्रेझेंटेशन आणि संवाद याचे अध्यायवत केंद्र बनवण्याचा संकल्प सुनील काळे यांनी व्यक्त केला.

चित्रकला सुद्धा भूतकाळ असतो प्रतिकूलता असते हलापिष्ट असतात यातून तो पुढे तो हे प्रेक्षक समजावून घेत नाही चित्राचे सामान्करण करणे ही आपल्या भारतीयांची मानसिकता बदलायला हवी कला विश्वात वर्गवाद वर्ण वाद गरीब श्रीमंत अशी भेदनीती चित्रकला क्षेत्रात वाढत असून त्यामुळे मराठी भाषेत चित्रांची समीक्षा आस्वादक व कलाप्रकार नुसार अपवादात्मक पद्धतीने केली जाते आहे समीक्षा ज्या चित्रांची होते तो चित्रकार मोठा असा समज मराठी वाचकांनी तयार करून घेतला आहे नियतकालिकांनी याचा व्यापार चालवला आहे वृत्तपत्रांनी चित्र समीक्षेतसंकीर्ण वाद आणला आहे हे सर्व बदलायला हवे समीक्षा नियतकालिके वृत्तपत्रे यांनी निरपेक्षपणे करायला हवी तरच चित्र गाजतील चित्रांची चर्चा होईल चित्र ग्राहकांच्या पर्यंत पोहोचतील अन्यथा प्रदर्शनातील चित्रे ही भिंतीवर राहतात आणि समाज मनाचे समृद्ध घडणे कलानंदाच्या दिशेने विकसित होणे हे समाजवर्तन विकसित होत नाही हा आजचा प्रवास बदलायचा असेल तर निसर्ग आर्ट प्रदर्शनासारख्या अनेक कला केंद्रांच्या निर्मितीतून संस्कृती केंद्र तयार करणे आणि नव्या पिढीला भावनिक दृष्ट्या समृद्ध करणे हे प्रयत्न परीक्षेच्या पलीकडे डिग्रीच्या पलीकडे जाऊन करण्याची गरज असून शिक्षण क्षेत्राने कलेतील इतिहास कलेतील प्रतीक वाद कलेतील साक्षरता कलेतील प्रकार कलेतील अभिजातता कलेतील निसर्गाचे प्राचीन महत्त्व वर्तमानातील कलाचा शिल्लक वारसा हे सर्व आंतरविद्यासाठी ज्ञानाच्या भौगोलिक ज्ञानाच्या बरोबर सर्व पदवी शिक्षणामध्ये शिकवायला हवे तरच कला साक्षरता ही ज्ञान शाखा म्हणूनअर्थ करण्याचे क्षेत्र म्हणून समाजाची खात्री पटेल आणि समाज कलावंत यांची कला साधना याचे मामुलीकरण करणार नाही कला ही एक उच्च आनंद निर्माणची अभिरुची समाज समृद्धीची गोष्ट असते आणि तो ज्ञान प्रवाह असाच प्रतिभावंत कलाकारांच्या अथक प्रयत्नातून विकसित होत राहतो पहावा.

असे स्वाती काळे व सुनील काळे हे दोन्हीही कलावंत सतत संवादातून सांगत राहतात त्या ऐकत राहणे आणि त्यांच्या सृजन कलानंदाचा श्रोता होणे यासारखी भूमिका वेगळी काय असू शकते या सर्व कलानंदाच्या प्रवासात विजय दिवाण रवींद्र घोडराज यांचे सुनील काळे यांनी केलेले स्वागत आणि मनमोकळ्या मारलेल्या गप्पा एका कला विश्वाचा एकूण आढावा सादर करून गेल्या आणि त्यातूनच इतिहासाचे मालक अवशेषाचे मालक वाड्यांचे मालक किल्ल्यांचे मालक या ऐवजी भारतभर नव्या सृजनप्रतिबांच्या निसर्ग आर्ट प्रदर्शनाची पाऊलवाट चित्रकार ला चालू लागलेले आहेत आणि अनेक ठिकाणी संस्कृती केंद्र आणि निसर्ग आर्ट प्रदर्शन ही पर्यायी व्यवस्था शासनाच्या मदतीशिवाय कलावंत चित्रकार स्वतः तयार करत आहेत ही गोष्ट खूप अभिमानाची आनंदाची आत्म सन्मानाची आणि स्वाभिमानाची वाटून राहते या दोघांना प्रेक्षकांची प्रतिसादाची भूक आहे प्रदर्शन पाहण्यास आलेल्या नागरिकांच्या स्वाक्षऱ्या व अभिप्राय घेण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे पण चित्र चांगले आहे याच्या पलीकडे चित्र काय आहे याची समीक्षा आणि चर्चा शब्दबद्ध करताना येणारा बहुसंख्य प्रेक्षक हा कला साक्षरतेतील मोठा अडसर आहे आणि कलानंदाचा तो वंचित घटक ठरतो हे ही आज समजून आले घरात कला असते पण कलेचीच घर असते सर्वत्र चित्र रेखीव मांडणी कला दृष्टिकोनाचा पदोपदी अनुभव आणि अत्यंत आकर्षक आधुनिक रचना यातून कलावंतांचे वेडेपण पाहून खरे साठी जगता येते कलेच्या आनंदात रममान होऊन जीवन स्वतःचे व इतरांचे आनंदी करता येते असा हा निसर्ग आर्ट प्रदर्शनाच्या दोन कलावंतांचा प्रयत्न सातारा जिल्ह्यातील पुणे मुंबई मधील कलापूर्वी प्रेक्षक पर्यटक समजावून घेतील काय असं मनोमन सतत आशावादी प्रश्न उपस्थित राहतो आणि म्हणूनच आपला आनंद इतरांना वाटणारे आपले रंग समृद्ध भाव विश्व इतरांच्या जीवनात रंग भरण्याचे काम करणारे हे दोन रंगवेडे सर्वत्र पोहोचतील कसे हाच एक प्रश्न परत फिरताना वाटून राहिला निसर्ग अर्थ प्रदर्शनाची छोटी पुस्तिका तयार करण्यासाठी धावत पडत वाईला निघालेले सुनील काळे गंगापुरीच्या गल्लीत विजय दिवाण व या कार्यकर्त्याला परत वाई सोडतात तेव्हा रस्त्यावरच त्यांना दोघांना भेट देण्यासाठी आणलेले एकात्मिक शिक्षण हे पुस्तक विजय दिवाण यांच्या हस्ते सुनील काळे यांना सप्रेम भेट देताना रस्त्यावरचाच पुस्तक भेटीचा उन्हातील आनंद घेऊन हा कार्यकर्ता परत फिरतो पुन्हा पुन्हा कलेच्या समीक्षेकडे जातो त्यातीलच ही एक अक्षर ओळ वाचकांसाठी शब्द बद्द केली आहे.

**– शिवाजी राऊत**
**सातारा**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## सन २०२५- २६ या वर्षात सोलापूर जिल्ह्याला एकूण ५ हजार २०० कोटीचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट, खरीप हंगामासाठी २ हजार ८५९ कोटी तर रब्बी हंगामासाठी २ हजार ३४० कोटी; सन २०२५- २६ या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्ह्याचा संभाव्य वित्त पुरवठा आराखडा २२ हजार ४०० कोटीचा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सन २०२४- २५ या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यातील सर्व बँकांना एकूण ४५९९ कोटी ९३ लाखाचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते तर बँकांनी ४ हजार ७५९ कोटी ६९ लाख इतका कर्ज पुरवठा करून उद्दिष्टापेक्षा अधिक काम केलेले आहे. त्याचप्रमाणेच यावर्षीही रब्बी व खरीप हंगामासाठी देण्यात आलेले पाच हजार दोनशे कोटीचे पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट सर्व बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. तसेच बँकांनी एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही यासाठी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय पुनर्लोकन समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमराजे निंबाळकर, आरबीआयचे जिल्हा अग्रणी बँक अधिकारी अक्षय गोंदेवार, नाबार्ड चे जिल्हा व्यवस्थापक नितीन शेळके, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे, आरसेटी संचालक दीपक वडेवाले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते, यांचेसह सर्व शासकीय महामंडळाचे व्यवस्थापक तसेच सर्व बँकाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सर्व बँकांनी पीक कर्ज व कृषी क्षेत्राला वित्त पुरवठा करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. पीक कर्जाचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढावे. यावर्षीच्या हंगामात एकाही शेतकऱ्याचा बँका पीक कर्ज देत नाहीत यासाठी प्रशासनाकडे तक्रार येऊ नये यासाठी खबरदारी घ्यावी असेही त्यांनी सूचित केले. यावर्षीच्या वार्षिक वित्तपुरवठा आराखड्यात खरीप पिकासाठी २ हजार ८५९ कोटी २१ लाख तर रब्बी हंगामासाठी २ हजार ३४० कोटी ७९ लाख रुपये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्याचे बँकांना उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावेत असेही त्यांनी सूचीत केले.

या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील सर्व बँकांची प्रत्येक महिन्याला पीक कर्ज वाटप, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम तसेच अन्य महत्वपूर्ण शासन पुरस्कार योजनांसाठी बैठका घेण्यात येतील. त्यावेळी सर्व बँकांनी त्यांना पीक कर्ज कृषी क्षेत्रात तसेच शासन पुरस्कृत योजना साठी कर्ज पुरवठा करण्याचे देण्यात आलेले उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करावेत. ज्या बँका शासन पुरस्कृत योजनांसाठी वित्त पुरवठा करणार नाहीत अशा बँकाबाबत आरबीआय कडे तसेच राज्यस्तरीय पुनर्लोकन समितीकडे अहवाल पाठवण्यात येईल असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केले.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी प्रत्येक बँकांनी व जिल्ह्यातील त्यांच्या प्रत्येक शाखेच्या दर्शनी भागात स्केल ऑफ फायनान्स चा होर्डिंग लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील एकही शेतकरी पेरणीसाठी आवश्यक पैशाची तरतूद करण्यासाठी खाजगी सावकाराकडे गेला नाही पाहिजे याची जबाबदारी बँकाची असल्याचे त्यांनी सुचित केले. या ठिकाणी अनेक बँकांचे अधिकारी चुकीची आकडेवारी सादर करत आहे तरी पुढील बैठकीला येताना सर्व बँकर्सनी अत्यंत काटेकोर माहिती समितीला सादर केली पाहिजे याबाबत दक्षता घ्यावी. राष्ट्रीयकृत बँकांनी नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या खातेदारांना व्याजदरातील सवलतीचा लाभ मिळवून देण्याबाबत मार्गदर्शन करावे यासाठी जिल्हा सहकारी संस्थांचे उपनिबंधक यांनी लक्ष घालावे असेही त्यांनी सुचित केले.




आरसेटी चे संचालक दीपक वडेवाले यांनी मागील आर्थिक वर्षात जिल्ह्यातील बाराशे लोकांना प्रशिक्षण देऊन त्यांना व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आलेले आहे यातील ७० टक्के लोकांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रारंभी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे यांनी जिल्ह्याचा सन २०२४- २५ चा वार्षिक वित्तपुरवठा शंभर टक्के पूर्ण झाल्याची माहिती दिली. तसेच मागील वर्षी खरीप व रब्बी हंगामातील पीक कर्ज वाटप १००% पेक्षा अधिक झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वार्षिक वित्तपुरवठा आराखडा उद्दिष्ट २०२७० कोटी ४२ लाख इतके होते तर २१ हजार २९७ कोटी ४८ लाख इतके उद्दिष्ट पूर्तता झालेली असून यावर्षीचा वार्षिक वित्तपुरवठा आराखडा २२ हजार ४०० कोटीचा असून खरीप व रब्बी पीक कर्जासाठी एकूण पाच हजार दोनशे कोटीची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

सर्व बँकांनी पीक कर्ज वाटप तसेच शासन पुरस्कृत योजनांसाठी दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे वित्तपुरवठा करण्यात येईल असे सांगितले.

---

## थोडक्यात...



### पंढरीत अवकाळी पावसाचा दणका

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पंढरपूर सह तालुक्यातून अवकाळी पावसाचा जोरदार दणका देऊन वातावरण बदललेले आहे त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झालेला आहे.

सुरुवातीला वादळी वारे सुरू झाले होते परंतु ढगाळ वातावरणाने मुसळधार पाऊस पाऊस झाल्याने रस्त्यावर तळ्याचे स्वरूप निर्माण झाले होते शहराच्या सखलबर्गामध्ये अनेक ठिकाणी पाणी साठले होते त्यातून वाहनांना रस्ता शोधत वाहने पुढे आखत होती हो येना जाणाऱ्यांना चालताना पाण्यातून कसरत करावी लागत होती.


शहरातील प्रदर्शना रोडला प्रदर्शना घालताना पाण्यातून वाट काढावी लागत होती जवळजवळ दीड तास मुसळधार पाऊस चालू होता प्रदर्शना मराठी लोकांना व येणाऱ्या भाविकांना मंदिरपरासाठी दर्शनाला भाविकांना तारांबळ उडाली होती.

---

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा येथे (दि १४ ) रोजी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने प्रतिमा पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले, मराठा सेवा संघाचे बाळासाहेब माने, युवा सेना निरीक्षक किरण भैय्या गायकवाड, युवती सेना निरीक्षक आकांक्षा ताई चौगुले, शिवसेना तालुकाप्रमुख बळी मामा सुरवसे, युवा उद्योजक पवन बंबुळगे, महावितरणचे औदुंबर मोरे , पत्रकार प्रदिप भोसले, भाजपचे आर्यतेज संताजी चालुक्य, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष भैय्या सगर, भाजपाचे शहर अध्यक्ष साई टाचले, छावा संघटनेचे विष्णू भोसले, सुमित घोटाळे, अमोल पाटील, संतोष जाधव, शैलेश लोखंडे यांच्यासह रामपुरचे माजी उपसरपंच संतोष भोसले, देवा भोसले, शाम आबाचने, आकाश राजे, महादेव कोळी, विष्णू पवार, शुभम भोसले, केदार बिराजदार, बबलू भोसले, केदार भोसले, कल्लेश्वर घोडके यांच्या सह शिवशंभू भक्त उपस्थित होते.



# कोठुरे विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय, कोठुरे ता.निफाड विद्यालयाचा एसएससी परीक्षा मार्च २०२५ चा निकाल- ९८.४१% लागला असून विद्यालयातील प्रथम पाच गुणवंत विद्यार्थी-

१. श्रावणी धनंजय आभाळे ९१.६०% २. सायली माणिक पवळे ८९.४०% ३. संध्या शिवाजी सोनवणे ८६.२०% ४. श्रेया तानाजी मोगल ८४. ४०% ५. पुनम सुनील माळी ८४. २०%

विद्यालयाच्या यशाबद्दल माविप्र सरचिटणीस ड.नितीन ठाकरे मविप्र सभापती तथा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, निफाड तालुका संचालक शिवाजीराव गडाख, तसेच शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

---

# छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यापासून युवकांनी प्रेरणा घ्यावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट:छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी मोघलांविरुद्ध बंड पुकारले. प्राणाची आहुती देत स्वधर्माचे रक्षण केले. त्यातून त्यागाचा मानदंड घालून दिला. म्हणून त्यांच्या कार्यापासून तरुणांनी प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

### देश रक्षणासाठी तरुणांनी कटीबद्ध व्हावे

**भारत पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशाचे रक्षण अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. म्हणून तरुणांनी लष्करामध्ये भरती झाले पाहिजे, छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श घेऊन पराक्रम गाजवून देशाचे रक्षण केले पाहिजे, असे यावेळी प्रतिपादन डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले.**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या संभाजी महाराज जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा शिल्पा धूमशेट्टी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, राजनीती तसेच

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने अभिवादन कार्यक्रम




युद्धकलेत छत्रपती संभाजी महाराज निष्णात होते. ते अत्यंत बुद्धिमान देखील होते. त्यांनी संस्कृत भाषेत बुधभूषण ग्रंथ लिहिला. त्यांनी हिंदी भाषेत देखील ग्रंथ लिहिले. ते महाविद्वान व व्यासंगी होते. त्यांनी भाषा आणि धर्म संस्कृतीचे रक्षण केले. म्हणून जगाच्या इतिहासात बुद्धिवंत,कीर्तिवंत महापराक्रमी राजा असा त्यांचा नावलौकिक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. मधुबाला लोणारी यांनी केले तर आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले.

---

**१८१५७०/ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत**

**सांगोला पोलिसांची जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई**

# मेडसिंगी तालुका सांगोला येथील जुगार अड्ड्यावर छापा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : १२/५/२०२५ सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन जगताप गोपनीय माहिती दाराकडून माहिती मिळाली असता मोजे मिळसिंगी गावच्या हद्दीत आश्रमशाळी जवळ अक्षय पवार यांच्या शेतात लिंबाच्या झाडाखाली काहीसं झाडाखाली जुगार खेळत आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावर मा पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टाफ सचिन जगताप पोहवा/१५४७ वझाळे पोन६८ मा ळी पोहे कॉ/१४४३ काझी पोको/१७८ पांढरे पोको१८११ गणेश कुलकर्णी अशा खाजगी वाहनाने पंचासह मौजे मेडशिंगी येथील अक्षय पवार यांच्या शेतामध्ये पोहोचले सदर ठिकाणी काहीसं गोलाकार बसलेली दिसले त्यांचा पोलिसांना जुगार खेळत असल्याचा संशय आल्याने त्यांना जागीच गराडा घालून १७ते ३० वाजता पकडले त्यांच्यासमोर पत्त्याची पाने व रोप रक्कम हातामध्ये काही पाणी घेऊन तो रमीचा जुगार खेळत असल्याचे पकडलेले इसमाचा पंचायत सह त्यांची नावे१) राजेंद्र अशोक कोकरे राहणार सांगोला व २) अख्तर मुसा मनेरी वय वर्ष ५१ राहणार सांगोला३) सागर शंकर गायकवाड वय ३२ वासोटा तालुका सांगोला ४) अक्षय अमर पदार वय वर्ष २८ मेडशिंगी तालुका सांगोला ५) शिराज इस्माईल मुजावर वय वर्ष ४६ शेगाव जत जिल्हा सांगली६) प्रशांत बबन घनवजी वैशाली भीम नगर सांगोला७ विठ्ठल धर्मराज केदार वय ४२ राहणार वासुद तालुका सांगोला अशी सांगितले व पकडलेले इसमाबरोबर जुगार मालक आरोपी क्रमांक दोन अख्तर मुसा मनेरी वय वर्ष कोण राहणार सांगोला हे असल्याचे सांगितले आम्ही पंचायत समक्ष जुगार खेळत असलेले इसमाची झाडाझडती घेतली असता आरोपी क्रमांक एक ते सात यांच्या ताब्यात असलेली रक्कम जुगाराची साहित्य मिळाल्या असून ते जप्त करण्यात आले आहे१८१५७०/ रोख रक्कम व जुगाराचे साहित्



१८१५७०/ मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळाला असून सहाय्यक पोली जगताप यांनी पंचायत समक्ष समक्ष त्यांच्या ताब्यात घेऊन जुगार अधिनियम महाराष्ट्र कलम दोन प्रमाणे पोलीस कॉन्स्टेबल यांनी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दाखल केलेली आहे

सदरची कामगिरी मा श्री अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण मा श्री श्री प्रीतम यावलकर सु अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण मा श्री विक्रांत गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर सो मंगळवेढा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सांगोला विनोद घोंगे पोलीस कॉन्स्टेबल काझी पांढरे व श्री गणेश कुलकर्णी यांनी सदरची कारवाई केली आहे.

---

# परिचारिका या वैद्यकीय सेवेच्या भविष्य आहेत : डॉ. मंजुषा शहा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : रुग्णसेवा ही ईश्वरसेवा आहे असे समजून परिचारिका सेवा बजावीत असतात. परिचारिका या डॉक्टर व पेशंट या मधला महत्त्वाचा दुवा आहेत. डॉक्टर काही वेळा पुरते रुग्णा सोबत असतात मात्र पूर्णवेळ परिचारिका त्यांच्या संपर्कात असतात. त्यामुळे परिचारिका या त्यांच्या कुटुंबाचा एक भाग झालेल्या असतात. या व्यस्त रुग्णसेवेतून त्यांनी स्वतःसाठी व आपल्या परिवारासाठी वेळ दिला पाहिजे. परिचारिका या स्वस्थ असतील तर रुग्णसेवा देताना त्या अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतात. परिचारिकाशिवाय वैद्यकीय क्षेत्र हे अपूर्ण आहे त्यामुळेच परिचारिका या वैद्यकीय सेवेच्या भविष्य आहेत असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. मंजुषा शहा यांनी केले.



इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा सत्कार समारंभआयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी डॉ. मंजुषा शहा बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन डॉ. आयेशा रंगरेज, आय.एम.ए. चे उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सदस्या ड. रत्ना शहा-अंत्रोळीकर, आय.एम.ए.चे सचिव डॉ. प्रवीण नरोटे, खजिनदार डॉ. निजामउद्दीन कोतवाल, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांचा आदर्श समोर ठेवून परिचरिकांनी आपले ज्ञान अद्यावत करावे. परिचारिका या आरोग्य सेवेतील महत्वाचा घटक आहेत.

यावेळी परिचारिकासाठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, गायन व रॅम्प वॉक अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक विजेत्यांना प्रमाणपत्र, भेटवस्तू देण्यात आल्या. तर सोलापूर शहरातल्या विविध रुग्णालयातील ८० होऊन अधिक परिचारिकांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ. प्रवीण नरोटे यांनी केले प्रास्ताविक डॉ. राजीव प्रधान यांनी केले. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले. आभार ड. रत्ना अंत्रोळीकर - शहा यांनी मानले.

# हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांच्या अंदाजाने शेतकऱ्यांमध्ये कही खुशी कही गम..

## रब्बी हंगामातील पिके तसेच फळबागा अतोनात नुकसान; २० मे पर्यंत जोरदार पावसाच्या सरी बरसरणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : काही दिवसापासून महाराष्ट्रात जर आपण बघितले तर विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट तसेच वादळी वाऱ्यांनी धुमाकूळ घातला असून काढणीला आलेल्या रब्बी हंगामातील पिके तसेच फळबागा यांचे अतोनात नुकसान झाले. हवामान खात्याच्या माध्यमातून अजून‌ही काही दिवस महाराष्ट्राला अवकाळीचा धोका असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामध्येच आता शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर विश्वास असलेले हवामान तज्ञ पंजाबराव डख यांनी देखील शेतकऱ्यांसाठी एक तातडीचा मेसेज जारी केला असून शेतकऱ्यांना धडकी भरेल असाच हवामान अंदाज वर्तविला आहे.

अवकाळी पावसाच्या बाबतीत पंजाबरावांनी वर्तवलेला हवामान अंदाज बघितला तर त्यांनी असे म्हटले की, ज्या शेतकऱ्यांचे कांदा पीक असेल अशा शेतकऱ्यांनी १२ तारखेपर्यंत म्हणजेच आज पिकाची काढणी करून पीक व्यवस्थितरित्या झाकून ठेवणे गरजेचे आहे.कारण की राज्यामध्ये १२ मे पासून ते २० मे पर्यंत भाग बदलत चक्क पावसाळ्यासारखा पाऊस पडणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी या पावसाबद्दल माहिती देताना म्हटले की हा जो काही पाऊस येईल तो मान्सूनपूर्व पाऊस असणार आहे निकोबार बेटावर मान्सूनची एन्ट्री होणार असून यावर्षी जवळपास आठ ते दहा दिवस मान्सूनचे आगमन लवकर होत असल्याचे देखील त्यांनी म्हटले.तसेच त्यांनी पुढे म्हटले की १९ मे पर्यंत मान्सून अंदमान निकोबार बेटावर स्थिर राहील आणि त्यानंतर मात्र २१ मे नंतर राज्यात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे उशीर न करता अगदी वेळेत मान्सूनची महाराष्ट्रामध्ये एन्ट्री होणार असे देखील त्यांनी म्हटले व इतकेच नाहीतर दरवर्षी आपल्याला मान्सूनची ज्याप्रमाणे वाट बघावी लागते तशी वाट या वर्षी बघण्याची गरज भासणार नाही.म्हणजेच एकंदरीत पंजाबराव डख यांच्या अंदाजावरून आपल्याला दिसून येते की सध्या १२ तारखेपासून ते १९ तारखेपर्यंत महाराष्ट्रामध्ये भाग बदलत अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांनी बऱ्याच बाबतीत सावधगिरी बाळगणे खूप गरजेचे आहे व पिकाची काळजी घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.तसेच मान्सूनच्या आगमनाबाबत त्यांनी वर्तवलेला अंदाज अनेकांच्या मते अतिशय समाधानकारक आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रदेश पदाधिकारी व जिल्हाध्यक्ष यांच्या निवडी जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रदेश पदाधिकारी व जिल्हाध्यक्ष यांच्या निवडी करण्यात आल्या.यावेळी राज्यमंत्री मा.ना.श्री. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पक्षाच्या ध्येय-धोरणांचा प्रसार व्यापक करण्यासाठी आणि सोशल मीडिया माध्यमांतून पक्षसंघटनेस अधिक बळकटी देण्यासाठी सोशल मीडिया विभाग प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस तथा कोषाध्यक्ष मा. आ .श्री. शिवाजीराव गर्जे, मुख्य प्रवक्ते मा.श्री. आनंद परांजपे,युवक प्रदेशाध्यक्ष मा. श्री. सूरज चव्हाण, सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. आनंद पवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सर्व निवनियुक्त पदाधिकाऱ्यांना पक्षाच्या वतीने अभिनंदन आणि नव्या जबाबदारीसाठी हार्दिक शुभेच्छा !

### राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया कडून जिल्हाध्यक्ष पदाच्या नेमणूका

# दै. यशसिद्धी न्यूज चे प्रतिनिधी प्रफुल्ल शेवाळे यांच्याकडे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष पदाची जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/विजय घनघाव : मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात सोशल मीडिया सेल च्या राज्यातील प्रदेश पदाधिकारी,विविध जिल्हा अध्यक्ष आणि जिल्हा उपाध्यक्ष यांच्या नेमणुका आज करण्यात आल्या.

यावेळी दै. यशसिद्धी न्यूज चे पत्रकार प्रफुल्ल शांताराम शेवाळे यांच्या कडे राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया अध्यक्ष ठाणे जिल्हा ग्रामीण पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.





मागील वर्षभरातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तसेच महायुती च्या विविध बातम्या, भूमिका प्रफुल्ल शेवाळे यांच्या कडून शहापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस सोशल अध्यक्ष या नात्याने मीडिया पेज द्वारे व्यक्त करण्यात आल्या होत्या. शेवाळे यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत (भाऊ) गोंधळे यांनी सोशल मीडिया प्रदेश अध्यक्ष आनंद पवार यांच्या कडे शिफारस केली, आणि प्रफुल्ल शेवाळे यांच्या कडे ठाणे जिल्हा ग्रामीण सोशल मीडिया अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली.

ठाणे ग्रामीण मध्ये येणाऱ्या सहा विभागात आपलं सोशल मीडिया चे वलंय जास्तीत जास्त नेटाने पसरवून, अतिशय जबाबदारीने आपली योग्य ती भूमिका प्रभावशाली पणाने व्यक्त करीत राहू असं मत प्रफुल्ल शेवाळे यांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव तसेंच शहापूर तालुका आमदार दौलत दरोडा यांच्या वेळोवेळी मिळणाऱ्या बहुमोल मार्गदर्शनपर आभार व्यक्त करीत, भरत (भाऊ) गोंधळे यांचे विशेष आभार मानून इतर पदाधिकारी महिला जिल्हाध्यक्ष सौ. कल्पना तारमळे, प्रदेश चिटणीस डी. के. विशे सर, शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे,प्रांतिक सदस्य रवींद्र परटोळे यांचे सुद्धा आभार प्रफुल्ल शेवाळे यांनी व्यक्त केले आहेत.

# मंगळवेढा शिवसेना गटाची बैठक तालुका अध्यक्ष तुकाराम भोजने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा राज्यामध्ये व देशांमध्ये राजकारणाचा चिखल झाला आहे अशा परिस्थितीत हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन होऊ शकतात व सर्वसामान्य न्याय देऊ शकतात आणि तोच विचाराचा वारसा घेऊन पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे संपूर्ण राज्यभर काम करत आहेत त्यांच्या आदेशाने जपणारा शिवसेना घराघरापर्यंत वाड्यावर वस्ती वरती पोचवायची राहणार आहे यासाठी सर्वांनी कामाला लागलं पाहिजे असे विचार तालुकाप्रमुख तुकाराम भोजने यांनी मांडले पक्षांमध्ये काम करत असताना पक्षनिष्ठा सर्वतोपरी राहणार आहे पदाधिकाऱ्यांना त्याची जागा दाखवली जाईल तू पक्षाच्या संघटनात्मक वाढीसाठी ज्या ज्या वेळी बैठवा आयोजित केल्या जातील त्यावेळी त्या बैठकांना हजर राहणे बंधनकारक असेल जो पक्ष आदेश पाहणार नाही यांच्यावरती कार्यवाही केली जाईल असा सज्जन तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना भोजने यांनी दिला व ही बैठक संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या आदेशाने व जिल्हाध्यक्ष गणेश वानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी तालुक्यातील बहुसंख्य पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# निफाड मध्ये बुद्ध पौर्णिमा निमित्त धम्मरॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जगाला आणि जगण्याला सामोरे जाण्याची सम्यक दृष्टी देणारे,शांती व अहिंसेचा मार्ग दाखवणारे महाकारूणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती अर्थात बौध्द पौर्णिमा निफाड येथे साजरी करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव सोहळ्याच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते या निमित्ताने संपूर्ण निफाड शहरामध्ये बौद्ध समाज बांधवांच्या वतीने धम्म रॅली काढून तथागत भगवान गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यात आला. या निमित्ताने कालकथित आनंद काशिनाथ साबळे यांच्या स्मरणार्थ खीरदान करण्यात आले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर जिमखाना व जयंती उत्सव सोहळ्याचे समितीच्या कार्यकर्त्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी निफाड शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नंगपुरामुर्री निवासी शाळेचा शंभर टक्के निकाल

**प्रावीण्य श्रेणीत १४ : १२ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील वर्ग दहवीचे विद्यार्थी सर्वच उत्तीर्ण झाले असून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेचे प्रावीण्य श्रेणीत १४ तर १२ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

शाळेतून सावन बळीराम जाधव हा शाळेतून प्रथम आला असून ८६.०० तर द्वितीय योगेश डोंगरे ८५.६० तसेच अनामिक दुर्योधन याला ८५.२० टक्के घेऊन प्रावीण्य प्राप्त केले आहे. दरवर्षी प्रमाणे यंदा ही शंभर टक्के निकाल लावण्याची परंपरा राखून ठेवली. यशाचे श्रेय आईवडिलांना देऊन शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, वर्गशिक्षक नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, अस्मिता तेलंग, प्रदीप ढवळे, साधना पारधी व तुषार महाजन यांनी अथक परिश्रम घेतले आहे.

# कोठूरे येथुन मुलगी बेपत्ता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील कोठुरे येथून वनिता मनोहर निकम वय १९ वर्ष ही घरात कुणासही काही एक न सांगता अचानक निघून गेली असून चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे सदर मुलगी शरीराने मध्यम बांधा, उंची अंदाजे पाच फूट, चेहरा गोल, रंगाने गोरी असून, डोळे काळे , नाक सरळ असून अंगात सफेद रंगाचा टी-शर्ट गुलाबी रंगाची पॅन्ट पायात सँडल आहेत, तिचे वडील मनोहर शिवाजी निकम यांनी निफाड पोलीस ठाण्यात या बाबत खबर दिली असून निफाड पोलीस स्टेशनचे पो. नि. गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार साळवे, पुढील तपास करीत आहे. वरील वर्णनाची मुलगी कुणाच्या नजरेत पडल्यास निफाड पोलीस स्टेशन या नंबरवर संपर्क ०२५५०/२२१०३३ साधावा.

# दुधनी येथे हजरत दावलमलिक दरगाहचे ऊरुस हिंदु-मुस्लिम बांधवांकडून उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/निगपा निबाळ :अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील हिंदु-मुस्लिमांचे भावैक्याचे प्रतिक असलेल्या दावलमलिक दर्गाह चे ऊरुस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली आहे.



दावलमलिक ऊरुस हा दरवर्षाप्रमाणे यंदाही प्रारंभी संदल,चिराग व जियारत असे सलग तीन दिवस कार्यक्रम ऊरुस कमिटीच्या वतिंने आयोजित करण्यात आली होती. या सुरुवातीच्या संदल (गंध) हा कार्यक्रम दारुकाम चे सोभायात्रेने साजरा करण्यात आली आहे. या प्रसंगी गावचे सुपुत्र अक्कलकोट तालुका कांग्रेस चे तालुका अध्यक्ष श्री शंकर म्हेत्रे, मुस्लिम पंच कमेटी अध्यक्ष जिलानी नाकेदार, रिपब्लिकन पक्ष (आठवले गट)चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी, श्री हब्बू बळूर्गी, गौस शेखजी, नाझिम बळूर्गी, इरफान चौधरी, उमर मणियार, अकबर जिन्नासाब मुल्ला, माहेजबीन इब्राहिम मुल्ला, सैफन महमदहनीफ मुजावर, सद्दाम बडेख़ां, दानेश शेख, शरीफ मुजावर, महमद बांगी, नजीर शेखजी, मलंग मुजावर, सैफन हसनसाब मुजावर, आरिफ मुजावर, शाबा जावले, सोनू मुस्तफा मुजावर, मदार मुजावर शेख राठोड व विजयकुमार धोडमनी सह इतर भक्तगण उपस्थित होते.

# माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : माय भारत, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, देशभरातील तरुणांना माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी सक्रियपणे एकत्रित करत आहे. माय भारत त्यांच्या युवा स्वयंसेवकांच्या गतिमान नेटवर्कला आणि इतर सर्व उत्साही तरुण नागरिकांना पुढे येऊन माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करते आहे. नोंदणी प्रक्रिया सोपी आणि अधिकृत माय भारत पोर्टल: https://mybharat.gov.in द्वारे उपलब्ध आहे

हे राष्ट्रव्यापी आवाहन तरुण नागरिकांना राष्ट्रीय कार्यात, विशेषत: आपत्कालीन परिस्थिती आणि संकटाच्या वेळी, महत्वाची भूमिका बजावण्यासाठी सक्षम करण्याच्या एकत्रित प्रयत्नांचा एक भाग आहे. उपक्रमाचे उद्दिष्ट एक सुप्रशिक्षित, प्रतिसाद देणारी आणि लवचिक स्वयंसेवक दल तयार करणे आहे जे नैसर्गिक आपती, अपघात, सार्वजनिक आपत्कालीन परिस्थिती आणि इतर अनपेक्षित परिस्थितीत नागरी प्रशासनाला पूरक ठरू शकेल. सध्याची परिस्थिती आणि उदयोन्मुख सुरक्षा चिंता लक्षात घेता, एक मजबूत, समुदाय-आधारित प्रतिसाद यंत्रणा स्थापित करण्याची तातडीची आणि वाढती गरज आहे. नागरी संरक्षण स्वयंसेवक विविध सेवांद्वारे स्थानिक अधिकाऱ्यांना पाठिंबा देऊन या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यामध्ये बचाव आणि निर्वासनकार्ये, प्रथमोपचार आणि आपत्कालीन काळजी, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, सार्वजनिक सुरक्षा आणि आपत्ती प्रतिसाद आणि पुनर्वसन प्रयत्नांमध्ये मदत करणे यांचा समावेश आहे. 'सज्ज आणि प्रशिक्षित नागरी दलाचे महत्व पूर्वीपेक्षा जास्त आहे आणि माय भारत या राष्ट्रीय मोहिमेत योगदान देण्यास वचनबद्ध आहे. म्हणून, माय भारत त्यांच्या युवा स्वयंसेवकांच्या गतिमान नेटवर्कला आणि इतर सर्व उत्साही तरुण नागरिकांना पुढे येऊन माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करते. विद्यमान माय भारत स्वयंसेवक आणि या पदावर देशाची सेवा करू इच्छिणारे नवीन व्यक्ती दोघांनाही सामील होण्यास स्वागत आहे. हा उपक्रम केवळ तरुणांमध्ये नागरी जबाबदारी आणि शिस्तीची तीव्र भावना निर्माण करत नाही तर त्यांना व्यावहारिक जीवनरक्षक कौशल्ये आणि गंभीर परिस्थितीत जलद कार्य करण्यासाठी प्रशिक्षण देखील देतो. तरुणांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यासाठी सर्व इच्छुक तरुणांना जनतेला एकत्रित करण्याचे आवाहन आहे. अधिक माहितीसाठी, माय भारत, जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे ( भ्रमणध्वनी क्र: ९९७०८२३९३०) यांच्याशी संपर्क साधावा.

### दि.१५ मे रोजी पंढरपूर महसूल विभागांतर्गत ११ मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान

# महाराजस्व समाधान शिबिर अभियानातून दाखले वाटप : तहसिलदार सचिन लंगुटे; पंढरपूर तालुक्यातील विद्यार्थी, नागरिकांनी लाभ घ्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महसूल विभागांतर्गत मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान दि.१५ मे रोजी पंढरपूर महसूल विभागांतर्गत ११ मंडळ स्तरावर राबिवण्यात येत आहे. या शिबीरातून आवश्यक दाखले देण्यात येणार असून, याचा लाभ विद्यार्थी, नागरिकांनी घ्यावा, असे आवाहंन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

इयत्ता १० वी व १२ वी परिक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी आवश्यक दाखले (उदा. उत्पन्न, वय व अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेयर दाखला व इतर दाखले देण्यासाठी तसेच नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले देण्यासाठी पंढरपूर तालुक्यात दि. १५ रोजी पंढरपूर, भाळवणी, पुळूज, कासेगांव, तुंगत, भंडीशेगांव, खर्डी, चळे, रोपळे, करकंब, पटवर्धन कुरोली या महसूल मंडळाचे ठिकाणी मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

या मंडळातील गावातील नागरिक, विद्यार्थी यांनी आपापल्या मंडळाच्या केंद्राच्या ठिकाणी जावून लाभ घेण्याचा आहे.

या शिबीरावेळी मंडळ निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांची नेमूणक करण्यात येत आहे. तरी शालेय विद्यार्थी व नागरिकांनी गांव निहाय महा ई सेवा केंद्र चालक यांच्याशी संपर्क साधवा. या शिबीरामध्ये जास्तीत संख्येने उपस्थित राहून दाखले प्राप्त करुन घ्यावेत. असे आवाहन तहसिलदार लंगुटे यांनी केले आहे.